# नि.दि.दा.क्र. ३४/२०१९.

## सौ.जिजा कृष्णाजी मडपाचे व ईतर –वि.– श्रीमती वेणुबाई पुंडलीक वेट्टी व ईतर

## CNR No.– MHYA–1800–1528 2019.

### निशाणी क्र. ३२ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ३,४ व ५ यांनी सुमारे ०३ वर्षे ०९ महिने व ०५ दिवसांचा विलंब माफ होवून त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना लेखी जबाब आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे स्विकारणेबाबत दाखल केला आहे. संबंधीत प्रतिवादींचे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरणी ते अशिक्षीत असल्याने तसेच अत्यंत दुगर्म भागत राहत असल्याने त्यांच्या वकिलांची भेट घेवून लेखी जबाब तयार करण्यास आवश्यक असणारी माहीती व कागदपत्रे देण्यास असमर्थ ठरले तसेच दरम्यान कोरोणा महामारीमूळे ताळेबंदी असल्याने ते लेखी जबाब दाखल करू शकले नाही. दरम्यान दि. १८/०१/२०२२ रोजी विना लेखी जबाब आदेश पारीत झाला आहे. सदर जबाब दाखल करण्यास सुमारे ०३ वर्षे ०९ महिने व ०५ दिवसांचा विलंब झाला आहे. सबब, संबंधीत प्रतिवादींनी प्रस्तुत अर्ज मंजूर करून सुमारे ०३ वर्षे ०९ महिने व ०५ दिवसांचा विलंब माफ करून त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना लेखी जबाब आदेश रद्द करुन त्यांचा लेखी जबाब स्विकारणेबाबत विनंती केली आहे.

०२. वादींच्या वतीने सदर अर्जांच्या मागील पृष्ठावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. वादींच्या वतीने कथन आहे की, विलंबा बाबत सयुक्तीक कारण नमूद नाही. सबब, अर्ज रक्कम रू. ५,०००/– खर्चासह खारीज करणेबाबत विनंती केली आहे.

०३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०४. प्रस्तुत अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो...** |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करीता :–**

०५. अभिलेखाचा विचार करता, संबंधीत प्रतिवादी क्र.३ व ५ यांना दाव्याचे समंनस बजावणी झाल्यानंतर ते निशाणी क्र. १५ वरील दि. १८/१२/२०१९ रोजीचे वकीलपत्र दाखल करून हजर झाले तसेच प्रतिवादी क्र ४ यांना समंन्स बाजवणी झाल्या नंतर ते नि क्र.२२ वरील दिनांक २३/०१/२०२० रोजीचे वकीलपत्र दाखल करून हजर झाले.त्यानंतर संबंधीत प्रतिवादींनी लेखी जबाब दाखल करणेस मुदत वाढवून मिळणेबाबत निशाणी क्र. २६ वर अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज दिनांक २०/०२/२०२० रोजी मंजूर करून त्यावरील आदेशाप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर नेमलेल्या तारखेस म्हणजेच दि. १६/०४/२०२० रोजी व त्यानंतर प्रतिवादींनी मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज दाखल केला नाही. तसेच लेखी जबाब सादर केला नाही. त्यामुळे दि. ११/०८/२०२२ रोजी निशाणी क्र.०१ वर संबंधीत प्रतिवादी यांचे विरुध्द विना लेखी जबाब आदेश पारीत केला आहे. त्यानंतर दि.३०/११/२०२३ रोजी संबंधीत प्रतिवादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०६. अभिलेखाचे अवलोकन करता संबंधीत प्रतिवादी यांनी हजर झाल्या नंतर नि.क्र.२६ नूसार मूदत वाढ मिळणे बाबत अर्ज दाखल केला होता व तो दिनांक २०/०२/२०२० रोजीच्या आदेशा प्रमाणे मंजूर देखील केला आहे. रोजनाम्याचे वाचन करता दिनांक १६/०४/२०२० पासून ते दिनांक १५/०७/२०२१ पर्यंत कोरोणा महामारी मूळे प्रकरण तहकूब झाल्याचे स्पष्ट होते. तथापी त्या नंतर दिनांक २०/०८/२०२१ ते ३०/११/२०२३ या कालावधी मध्ये विलंब झाला आहे. त्यावरून अर्जातील कोरोणा महामारी संदर्भात केलेल्या कथनांमध्ये तथ्य दिसून येते. त्यामुळे अर्जातील कथनांवर अविश्वास ठेवण्याचे कारण नाही. त्यामुळे मी या मतास आलो आहे की, अर्जात नमुद कारण विलंब माफ करणेस पुरेसे आहे. प्रस्तुत दावा वाटणी संदर्भात असून वाद मिळकत स्थावर मालमत्ता आहेत. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांची वादकथने अभिलेखावर दाखल असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजूर केल्यास वादींचे काही एक नुकसान होणार नाही, तसेच वादाचे निवारण दूतर्फा गुणदोषावर होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास संबंधीत प्रतिवादींना नैसर्गीक न्यायतत्व नाकारले जावून प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :–**

०७. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. अर्जात नमुद कारण विलंब माफ करणेस पुरेसे आहे. तथापि, दि. २०/०८/२०२१ ते प्रस्तुत अर्ज दाखल दि. ३०/११/२०२३ या एकूण २७ महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधीत प्रतिवादींन लेखी जबाब दाखल करणेस विलंब केला आहे. त्यामुळे, वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, संबंधीत प्रतिवादींवर वाजवी खर्च एकूण २७ महिन्यांकरीता प्रतिमाह करीता रक्कम रू.१००/–बसवणे न्यायाचे व योग्य आहे. सबब, मी न्यायाच्यादृष्टीने पुढील आदेश करीत आहे;

**आदेश**

१) संबंधीत प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचा विलंब माफ होवून त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना लेखी जबाब आदेश रद्द करुन त्यांचा लेखी जबाब स्विकारणेबाबतचा अर्ज निशाणी क्र. ३२, संबंधीत प्रतिवादींवर खर्च रक्कम रू. २,७००/– बसवून मंजूर करण्यात येतो.

२) संबंधीत प्रतिवादींनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस अगर तो पर्यंत वादींना देववावी.

३) संबंधीत प्रतिवादींनी आदेशाची पुर्तता केल्यास, त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर स्विकारण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2024.08.22 17:00:34 +0530

(अ.अ. उत्पात)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
घाटंजी, जि. यवतमाळ.

दिनांक :– २२/०८/२०२४.